**भविष्यनिर्वाह निधीतील वर्गणीच्या/ प्रदानांच्या गहाळ रकमांचे लेखांकन तातडीने करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
शासन परिपत्रक क्रमांक : भनिनि १०१२/प्र.क्र.११३/१२/१३-अ,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २०१२

संदर्भ : १) या विभागाचे क्र. भनिनि-१००४/५२१/प्र.क्र.४१/०४/१३-अ, दिनांक ३१/१०/२००७ चे परिपत्रक,
२) महालेखापाल (ले व अ)-१, महाराष्ट्र, मुंबई यांचे पत्र क्र. DO/PF(Misc)/Missing Credits/K-718/139-I, दिनांक २७/०९/२०१२.

**परिपत्रक**

महाराष्ट्र सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी नियम, १९९८ मधील तरतुदीनुसार वर्गणीदारांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये दरमहा जमा होणारी वर्गणीची रक्कम, तसेच वर्गणीदारांच्या विनंतीनुसार त्यांना अदा करण्यात येणारा अग्रिम यांच्या गहाळ रकमांच्या प्रकरणांत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे आढळून आले आहे.

दरवर्षी वर्गणीदारांना पाठविल्या जाणा-या भविष्यनिर्वाह निधीच्या वार्षिक लेख्यांमध्ये वर्गणीच्या/ प्रदानांच्या गहाळ रकमांची नोंद असते व त्याबाबत तात्काळ पूर्तता करण्याच्या सूचनाही सदर लेख्यामध्ये दिलेल्या असतात. तसेच वर्षातून दोनवेळा महालेखापालांच्या कार्यालयाकडून गहाळ रकमांची सूची सर्व आहरण व संवितरण अधिका-यांकडे कार्यवाहीस्तव पाठविण्यात येते. तथापि, संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून याबाबत पुढील कार्यवाही केली जात नाही. तसेच वर्गणीदारांकडूनही याबाबतचा पाठपुरावा केला जात नसल्यामुळे सन २००७ च्या आधीपासूनच्याही गहाळ रकमांच्या नोंदी न झाल्याचे महालेखापालांनी शासनाच्या निदर्शनास आणले आहे.

३. भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या/प्रदानाच्या गहाळ रकमांचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर निर्देश उक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३१/१०/२००७ च्या शासन परिपत्रकाद्वारे देण्यात येऊनही त्यातील निर्देशांनुसार **संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांकडून तसेच कार्यालय प्रमुखांकडून** आवश्यक कार्यवाही होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे.

४. भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या/प्रदानाच्या गहाळ रकमांची नोंद संबंधित वर्गणीदारांच्या खात्यांमध्ये नियमितपणे होत नसल्यामुळे सेवानिवृत्त होणाऱ्या वर्गणीदाराचे लेखे विहीत वेळेत प्रमाणित करणे शक्य होत नाही, ज्यामुळे सेवानिवृत्तीनंतरच्या अंतिम प्रदानास विलंब होतो व शासनास त्यावर व्याज प्रदान करावे लागते. ही अनियमितता व परिणामी होणारा विलंब टाळण्यासाठी या परिपत्रकान्वये पुन्हा सूचित करण्यात येते की, उक्त संदर्भ क्र.१ येथील दिनांक ३१/१०/२००७ च्या शासन परिपत्रकातील तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

५. महालेखापालांच्या कार्यालयाने जुलै, २०१२ मध्ये भविष्यनिर्वाह निधीच्या वार्षिक लेख्यांसोबत गहाळ रकमांची एक सूची (वर्गणीदाराचे नांव, भ.नि.नि.खाते क्र., गहाळ रक्कम व त्यांचे महिने या महितीसह) सर्व आहरण व संवितरण अधिका-यांकडे कार्यवाहीस्तव पाठविली आहे. तथापि अद्याप सदर गहाळ रकमांचे लेखांकन करण्याची कार्यवाही संबंधितांकडून करण्यात आलेली नसल्यामुळे असे निर्देशित करण्यात येते की, सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी दिनांक ३०/११/२०१२ पर्यंतच्या कालावधीत याबाबत एक **"विशेष तातडीची कालमर्यादित मोहीम"** राबवावी.

सदर मोहिमेंतर्गत, मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी खुद्द विभागांतील, तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख, कार्यालय प्रमुख तसेच आहरण व संवितरण अधिका-यांना त्यांच्या कार्यालयांतील भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या/प्रदानाच्या गहाळ रकमांची नोंद संबंधित वर्गणीदारांच्या खात्यांमध्ये तातडीने होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दिनांक १५/११/२०१२ पूर्वी पूर्ण करण्याच्या सूचना द्याव्यात. सदर कार्यवाही, दिनांक ३१/१०/२००७ च्या संदर्भांकित शासन परिपत्रकामधील विहित कार्यपध्दतीनुसार करण्यात यावी.

प्रशासकीय विभागांनी दिनांक १६/११/२०१२ ते ३०/११/२०१२ या कालावधीत त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांतील आहरण व संवितरण अधिका-यांकडून याबाबतचा कार्यपूर्ती अहवाल प्राप्त करुन घ्यावा.

सदर निर्देशांचे पालन न केल्यामुळे अंतिम प्रदानास विलंब झाल्यास व शासनास त्यावर व्याज प्रदान करणे भाग पडल्यास याबाबत विभागप्रमुखांनी संबंधित आहरण व संवितरण अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन अतिरिक्त प्रदानाच्या व्याजाची वसुली त्यांच्याकडून करावी.

६. तसेच मंत्रालयीन विभाग व पर्यवेक्षिय अधिका-यांनी, कार्यालय निरीक्षणाच्या वेळी पुढील बाबींची तपासणी करावी:-

अ) सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी वर्गणीदारांना मंजूर करण्यात आलेल्या परतावा/ ना-परतावा अग्रिमांची नोंद स्वतंत्र नोंदवहीत ठेवली आहे काय,

आ) महालेखापालांकडून वर्गणीदारांना पाठविल्या जाणा-या भविष्यनिर्वाह निधीच्या वार्षिक लेख्यांमध्ये वर्गणीच्या/ प्रदानांच्या योग्य वजाती दर्शविण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे काय, नसल्यास, वार्षिक लेख्यांमध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत महालेखापालांकडे आवश्यक पत्रव्यवहार तातडीने करण्यात आला आहे काय,

इ) महालेखापाल कार्यालयाकडून प्राप्त होणा-या गहाळ रकमांची सूचीनुसार दरवर्षी सर्व आहरण व संवितरण अधिका-यांनी त्यांच्या कार्यालयांतील भविष्य निर्वाह निधी अग्रिमाच्या/प्रदानाच्या गहाळ रकमांचे योग्य ते लेखांकन संबंधित वर्गणीदारांच्या खात्यांमध्ये तातडीने होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही केली आहे काय,

ई) महालेखापाल कार्यालयाकडून भविष्यनिर्वाह निधी संबंधी आलेले संदर्भ वेळच्या वेळी निकालात काढले गेले आहेत काय,

७. वरीलप्रमाणे कार्यवाही केली जात नसल्यास, त्यास जबाबदार असणा-या अधिकारी/ कर्मचा-याविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक 201210231241020807 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सु. ह. उमराणीकर)**
**अवर सचिव, सा.प्र.विभाग**

प्रति,

१. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (१० जादा प्रतींसह),
२. महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर (१० जादा प्रतींसह),
* ३. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
* ४. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* ५. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
* ६. प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* ७. प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* ८. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* ९. प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई,
१०. भारतीय लेखा परीक्षा आणि लेखा विभाग, महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र यांचे कार्यालय, भविष्य निर्वाह निधी शाखा, जुनी सी.जी.ओ.बिल्डींग, न्यू मरीन लाईन्स, १०१,महर्षि कर्वे रोड, मुंबई ४०० ०२० (२५ जादा प्रतींसह),
११. मुख्य लेखा परीक्षक, निवासी लेखे, कोकण भवन, नवी मुंबई,
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,

१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१४. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
१५. सर्व विभागीय आयुक्त,
१६. सर्व जिल्हाधिकारी,
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१८. ग्राम विकास विभाग/नगर विकास विभाग/वित्त विभाग (कोषा-प्र-५),मंत्रालय,मुंबई
१९. सर्व मंत्रालयीन विभाग,
२०. मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख/ कार्यालय प्रमुख (संबंधित मंत्रालयीन विभागांमार्फत)
२१. मंत्रालय मध्यवर्ती ग्रंथालय, मंत्रालय, मुंबई (२ प्रती),
२२. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२३. निवड नस्ती.

* पत्राने.